# वित्त विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

जि.प.प्रशासकीय ईमारत, शिवाजी पुतळयाजवळ, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड - 431601

दूरध्वनी :- 02462-234414 इमेल:- cafozpnanded@gmail.com

जा.क्र/जिपना/अखा/आस्था -1/1099/२०२४ दिनांक : 6 FEB 2024

प्रति,

------------------------------

------------------------------

विषय : वरिष्ठ सहाय्यक लेखा या पदाच्या सरळसेवा पदभरती २०२३.
मूळ शैक्षणिक / व्यावसायिक / अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रे पडताळणी करिता दि.20.02.2024 रोजी उपस्थित राहणे बाबत.

संदर्भ : 1) वरिष्ठ सहाय्यक लेखा पदासाठी IBPS कंपनी मार्फत ऑनलाईन घेण्यात आलेली परीक्षा दि.०७.१०.२०२३.
2) IBPS कंपनी मुंबई यांचे कडून वरिष्ठ सहाय्यक लेखा या पदाची जिल्हा परिषद नांदेड कडे प्राप्त झालेली एकत्रित गुणवत्ता यादी.
3) जि.प नांदेड कडून वरिष्ठ सहाय्यक लेखा या पदाच्या भरती २०२३ करिता प्रसिद्ध केलेली एकत्रित गुणवत्ता यादी.
4) जिल्हा निवड समितीच्या मान्यतेने दि.06.02.2024 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली गुणानुक्रमे कागदपत्रे तपासणी साठी बोलवावयाच्या उमेदवारांची यादी.

जिल्हा परिषद नांदेड सरळसेवा पदभरती 2023 अंतर्गत वरिष्ठ सहाय्यक लेखा या पदाची ऑनलाइन परीक्षा दि.07.10.2023 रोजी घेण्यात आली आहे. संदर्भ क्र.02 अन्वये IBPS कंपनी कडून प्राप्त निकाल संदर्भ क्र.03 अन्वये जिल्हा परिषदेच्या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आला आहे. संदर्भ क्र.04 अन्वये प्रवर्ग निहाय गुणानुक्रमे कागदपत्रे तपासणी साठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे सदर यादीतील उमेदवारांची वरिष्ठ सहाय्यक लेखा या पदाच्या पदभरती साठी मूळ शैक्षणिक व इतर आवश्यक सर्व कागदपत्रे/दस्ताऐवज तपासणी/पडताळणी दि.20.02.2024 (मंगळवार) रोजी सकाळी 11.00 वाजता, के.यशवंतराव चव्हाण सभागृह जिल्हा परिषद नांदेड येथे करण्यात येणार आहे.

तरी आपण मूळ कागदपत्रे तपासणी साठी आवेदन पत्राची प्रत तसेच जाहिरातीमधील परिच्छेद क्र.19 मध्ये नमूद केलेली व वरिष्ट सहाय्यक लेखा पदासाठी आवश्यक असलेली सर्व मूळ शैक्षणिक / व्यावसायिक / अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रे व त्याची एक साक्षांकित प्रतीसह दि.20.02.2024 (मंगळवार) रोजी सकाळी 11.00 वाजता के.यशवंतराव चव्हाण सभागृह,जिल्हा परिषद नांदेड येथे न चुकता उपस्थित राहावे. मूळ कागदपत्रे/दस्ताऐवज पडताळणी करिता गैरहजर राहिल्यास गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांना निवड प्रक्रिया संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी जिल्हा निवड समिती नांदेड यांच्या मान्यतेने –

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती नांदेड तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद नांदेड

प्रत माहितीस्तव सविनय सादर :
१) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती,जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड.
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नांदेड.
३) उप.मुख्य कार्यकारी अधिकारी (सा),जिल्हा परिषद नांदेड.

**स्वाक्षरीत/-**

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद नांदेड

# वित्त विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

जि.प.प्रशासकीय ईमारत, शिवाजी पुतळयाजवळ, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड - 431601

दूरध्वनी :- 02462-234414 इमेल:- cafozpnanded@gmail.com

जा.क्र/जिपना/अखा/आस्था -1/ /२०२४ दिनांक :


जिल्हा परिषद नांदेड सरळसेवा पदभरती २०२३

जिल्हा परिषद नांदेड कडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या वरिष्ठ सहाय्यक लेखा या पदासाठी गुणानुक्रमे बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाचे कागदपत्राची यादी

| अ.क्र | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा. |
| २ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ३ | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४ | वयाचा पुरावा |
| ५ | जन्माचा पुरावा |
| ६ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| ७ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,जात पडताळणी प्रमाणपत्र. |
| ८ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर करणेच्या दिनांकास वैध असलेले) |
| ९ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १० | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११ | खेळाडूंसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| १२ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १३ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५ | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञा पत्र |
| १८ | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २० | अनुभव प्रमाणपत्र |
| २१ | नावातील बदला बाबत प्रमाणपत्र / शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २२ | छायाचित्र ओळख पुरावा (आधार कार्ड, वाहन परवाना पुरावा, पॅनकार्ड, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे ओळखपत्र |
| २३ | कोणतेही सरकारी कार्यालय व्यापारी भागीदार संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील किमान ३ वर्षाचा अखंड सेवेचा अनुभवाचे प्रमाणपत्र |